प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (PM-KISAN) राज्यात राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- किसनि -२०१९/प्र.क्र.२०/११-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०१९

वाचा :- १) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना,
२) शासन निर्णय कृषि व पदूम विभाग क्र. किसनि-२०१९/प्र.क्र.२० -११ अे, दि.१५.०२.२०१९

शासन शुध्दीपत्रक :-

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजना** सुरू केली आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याबाबत दि.१५.०२.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि ,सदर शासन निर्णयामध्ये प्रस्तुत योजनेसंदर्भातील केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार अंशत: सुधारणा करणे आवश्यक असून त्या सुधारणा खालीलप्रमाणे वाचण्यात याव्यात.

१) ५.४) केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी /कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थांच्या अखत्यारीतील कार्यालयांमधील आणि स्वायत्त संस्थांचे सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नियमित अधिकारी / कर्मचारी (चतुर्थ श्रेणी / गट ड वर्गातील कर्मचारी)

**ऐवजी**

५.४) केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी /कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थांच्या अखत्यारीतील कार्यालयांमधील आणि स्वायत्त संस्थांचे सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नियमित अधिकारी / कर्मचारी (चतुर्थ श्रेणी / गट ड वर्गातील कर्मचारी **वगळून**)

२) ५.६ निवृत्तीवेतन धारक व्यक्ति ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रु.१०००० किंवा त्यापेक्षा जास्त आहे. (चतुर्थ श्रेणी / गट ड वर्गातील कर्मचारी)

**ऐवजी**

५.६ निवृत्तीवेतन धारक व्यक्ति ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रु.१०००० किंवा त्यापेक्षा जास्त आहे. (चतुर्थ श्रेणी / गट ड वर्गातील कर्मचारी **वगळून**)

२ सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतां २०१९०२२७१५२४११०७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Digitally signed by Dr.Kiran Patil
Date: 2019.02.27 15:27:12 +05'30'

**(डॉ.किरण पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति** -

१) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) विभागीय कृषि सह संचालक, कोकण विभाग, ठाणे
५) महालेखापाल-महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
७) उप सचिव (का.११-अे, का.१७-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) सह सचिव (फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे/ रायगड/ रत्नागिरी
१०) कक्ष अधिकारी (का.२-अे,का.१७-अे, का.१४-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) वित्त विभाग (व्यय-१, अर्थसंकल्प-१३/ विनियम), मंत्रालय, मुंबई-३२
१२) निवड नस्ती (कार्यासन ११-अे).